महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवा योजन विभाग
शासन निर्णय:- क्र. इएक्सएम ७३८६/५३२१६/९०१/ तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १५ ऑक्टोबर, १९८६.

पहावे:- १] शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग क्र. इएक्सएम ७३८४/३८७५१/[५३५]तांशि-१[अ] दि. २३.१.८६.

२] संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/व्याशिपमं× १९८६/४४/१२८२, दिनांक ३१.१.१९८६.

३] शासन शुध्दीपत्र, शिक्षण व सेवा योजन विभाग, क्रमांक: इएक्सएम ७३८४/३८७५१/[५३५]तांशि-१अ, दिनांक २५.२.१९८६.

**शासन निर्णय:-** शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग, दिनांक २३.१.१९८ अन्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या अभ्यासक्रमाकरिता परीक्षा घेण्यासाठी व्यवसाय शिक्षण परीक्षा, मंडळ स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. खाली दर्शविलेल्या नवस्थापित व्यवसाय शिक्षण मंडळाच्या रचनेस शासन तात्पुरत्या स्वरुपात मंजूरी देत आहे.

पदसिध्द सदस्य ........... ८

राज्य शासनाचे प्रतिनिधी

| | |
|---|---|
| १] संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| २] अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे किंवा त्यांचे प्रतिनिधी. | -"- |
| ३] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे किंवा त्यांचे प्रतिनिधी. | -"- |
| ४] उद्योग आयुक्त व उद्योग संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | -"- |
| ५] संचालक, सेवायोजन, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी. | -"- |
| ६] अध्य[illegible] सचिव, तंत्र परीक्षा मंडळ, मुंबई | -"- |
| ७] उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई व नागपूर. | -"- |

केंद्र शासनाचे प्रतिनिधी

१] प्रादेशिक संचालक, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण [प्रशिक्षण पश्चिम विभाग] द्वारा प्रगत, प्रशिक्षण संस्था मुंबई-२२

२] उपशिक्षणार्थी सल्लागार शिक्षण व सांस्कृतिक मंत्रालय [पश्चिम विभाग] भारत सरकार चर्चगेट, मुंबई.

३] संचालक, प्रशिक्षण व विभागीय मध्यवर्ती शिकाऊ उमेदवारी सल्लागार, शिक्षण व समाज कल्याण मंत्रालय [पश्चिम विभाग] भारत सरकार, कॉफर्ड मार्केट, फलटण रोड, मुंबई.

२. महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाची कामे त्वरित होण्याच्या दृष्टीने पूर्वीच्या एकत्रित मंडळाला असलेले आर्थिक अधिकार खाली दर्शविल्याप्रमाणे नवस्थापित मंडळाला देण्यात यावे.

अ] पूर्वीच्या तंत्र परिक्षा मंडळाला जे आर्थिक प्रशासकीय अधिकार प्रदान केले होते ते सर्व जसेच्या तसे या मंडळाला प्रमाणपत्र अभ्यासक्रमा-त्या-बाबत राहतील.

ब] व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाचे चेअरमन यांना विभागीय प्रमुखाचे तसेच सचिव यांना कार्यालय प्रमुख यांचे सर्व अधिकार असतील व त्याखेरीज सचिव हे मंडळाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून राहतील.

क] व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ नव्याने निर्माण होत असल्यामुळे या मंडळाला संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, मुंबई यांचेकडून देय लेखन सामुग्री, टंकलेखन यंत्रे व चक्रमुद्रीत यंत्रे पुरविण्यात येतील.

३. या प्रस्तावावर होणारा खर्च अर्थसंकल्पीय शिर्ष "२७७- शिक्षण- एफ-तंत्रशिक्षण [अेजे] संचालनालय व प्रशासन [अेजे] दोन [अ] तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ" या लेखा शिर्षाखाली मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर ३५३/८६, व्यय-५, दिनांक १४. २. १९८६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ स. म. आरेकर ]

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

चेअरमन, तंत्रशिक्षणपरीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सचिव, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

समितीचे सर्व पदसिध्द सदस्य [पत्राद्वारे]

उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद.

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-१, [अकौटन्स], मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.

महालेखापाल, महाराष्ट्र-२, [अकौटन्स], नागपूर.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

निवासी लेखा अधिकारी, मुंबई.

वित्त विभाग, मंत्रालय [व्यय-५]

उप सचिव [तंत्रशिक्षण], शिक्षण व सेवा योजन विभाग.

शिक्षण मंत्र्यांचे खाजगी सचिव.

स्वीय सहाय्यक राज्यमंत्री तांत्रिक शिक्षण.

निवड नस्ती तांशि-४.

एसआर